.nagpur

# NMC e NEWS LETTER

जानेवारी २०१९




/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

# निर्माणाधीन आणि प्रस्तावित प्रकल्पांना गती द्या!

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे निर्देश : विविध प्रकल्पांचा घेतला आढावा



नागपूर : नागपूर शहरातील सर्व निर्माणाधीन प्रकल्पांच्या कार्याचा वेग वाढवून तातडीने पूर्ण करण्यात यावे आणि प्रस्तावित प्रकल्पांची प्रशासकीय पूर्तता करून त्या कामांच्या निविदा काढण्याचे निर्देश केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिले.शासनाच्या विविध विभागांतर्गत नागपूर शहरात सुरू असलेल्या प्रस्तावित आणि निर्माणाधीन प्रकल्पांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी बुधवारी (ता. ३०) आयोजित बैठकीत सदर निर्देश त्यांनी दिले. बैठकीला महापौर नंदा जिचकार, मनपाच्या स्थायी समितीचे सभापती वीरेंद्र कुकरेजा, बी.ओ.टी., पीपीपी प्रकल्पांच्या पाठपुराव्यासाठी नेमण्यात आलेल्या प्रकल्प विशेष समितीचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित, मनपा आयुक्त अभिजीत बांगर, जिल्हाधिकारी अश्विन मुदगल, नासुप्र सभापती शीतल उगले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता उल्हास देबडवार उपस्थित होते. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत सुमारे पाच हजार गाळ्यांचे बांधकाम पूर्ण झाले असून ते वाटपासाठी तयार आहेत, अशी माहिती नासुप्रच्या सभापती शीतल उगले यांनी दिली. योजनेअंतर्गत आलेल्या अर्जांची सोडत काढण्यात यावी. अपूर्ण अर्जांमधील त्रुट्या दूर करून, आवश्यक बाबींची पूर्तता करून त्या अर्जांचाही सोडतीत समावेश करण्यात यावा, असेही निर्देश ना. नितीन गडकरी यांनी दिले. अंबाझरी येथील खुल्या रंगमंचासाठी (म्पी थिएटर) आवश्यक २३ एकर जागेपैकी साडे सात एकर जागेचा ताबा नासुप्रला मिळाला असल्याची माहिती नासुप्र सभापती शीतल उगले यांनी दिली. उर्वरीत जागेसंदर्भात जिल्हाधिकारी आणि नासुप्र सभापतींनी तातडीने विद्यापीठ कुलगुरुंशी बैठक घ्यावी व ती जागा ताब्यात घ्यावी. त्या जागेवर सुरक्षा भिंत करून शक्य तितक्या लवकर पुढील प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिले. केळीबाग रोड, जुना भंडारा रोड, गड्डीगोदाम, पारडी, सोमलवाडा, रामजी पहेलवान मार्गासाठी जागा उपलब्ध करून देण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाला संमतीपत्र देण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. गड्डीगोदाम आणि पारडी रस्त्यांबाबतची कार्यवाही १ फेब्रुवारी रोजी, जुना भंडारा रोड, केळीबाग रोड, रामजी पहेलवान रस्त्याबाबतची कार्यवाही ६ फेब्रुवारी रोजी तर गड्डीगोदाम, सोमलवाडा रस्त्यांच्याबाबतची कार्यवाही १६ फेब्रुवारी रोजी सुरु करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले. केळीबाग मार्गावरील बुधवार बाजाराच्या संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत. त्या कामाच्या निविदा काढून प्रत्यक्ष कार्याला सुरुवात लवकरात लवकर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. सक्करदरा येथील बुधवार बाजाराचे अंतिम डिझाईन सात दिवसांत तयार करून त्याच्याही निविदा काढण्याचे निर्देश त्यांनी दिले. यशवंत स्टेडियम येथील प्रस्तावित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियलसंदर्भात सूचनांसह नवीन प्रस्ताव तयार करण्यात यावा. स्थायी समिती सभापती, जिल्हाधिकारी आणि मनपा आयुक्तांनी त्याला अंतिम स्वरूप देऊन पुढील काही दिवसांत तो राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्याचे निर्देशही ना. गडकरी यांनी दिले. नागपूर मेट्रो रेल्वेतर्फे पाटणी चौकापर्यंत बांधण्यात येणाऱ्या डबल डेकर पुलाच्या लॅण्डींगमधील तांत्रिक आणि वाहतुकीच्या दृष्टीने व्यवहार्यता तपासण्यात यावी व त्यानंतरच त्याबाबत योग्य निर्णय घेण्यात यावा, असे निर्देश ना. नितीन गडकरी यांनी दिले. अजनी पूल ते वर्धा रोडला जोडणाऱ्या कारागृह परिसरातून जाणाऱ्या रस्त्याचे लोकार्पण शक्यतो २२ फेब्रुवारी दरम्यान करण्याचे निर्देशही ना. गडकरी यांनी दिले.

## प्रतिभावंत विद्यार्थिनींच्या भवितव्याला शिष्यवृत्तीमुळे बळ मिळेल : महापौर नंदा जिचकार




नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये अनेक प्रतिभावंत विद्यार्थी शिक्षण घेतात. आर्थिक परिस्थितीवर मात करून आपल्या यशाने नाव लौकीक करण्याचे सामर्थ्य आमच्या मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये आहे. मागील काही वर्षांपासून दहावीच्या निकालामधून अनेक विद्यार्थी, विद्यार्थिनींनी हे सिद्धही केले. अशा प्रतिभावंत विद्यार्थिनींच्या शिक्षणात खंड पडू नये, कोणत्याही कारणामुळे त्यांची स्वप्न भंग पडू नयेत यासाठी सुभाष चंद्रा फाउंडेशनने हाती घेतलेला उपक्रम अत्यंत स्त्युत्य आहे. फाऊंडेशनच्या 'सच विजया शिष्यवृत्ती'मुळे अनेक प्रतिभावंत विद्यार्थिनींच्या भवितव्याला बळ मिळेल, असा विश्वास महापौर नंदा जिचकार यांनी व्यक्त केला.सुभाष चंद्रा फाउंडेशनच्या वतीने 'सच विजया शिष्यवृत्ती' अंतर्गत गुरूवारी (ता. ३१) मनपा शाळेतील २५ प्रतिभावंत विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. सिव्हीलल लाईन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून महापौर नंदा जिचकार बोलत होत्या. यावेळी इसेल ग्रुपच्या शिक्षण सल्लागार नव्यता गोयंका, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, महावितरण नागपूर विभागाचे मुख्य अभियंता दिलीप घुगल, इसेल स्मार्ट यूटीलिटी नागपूरचे प्रमुख सोनल खुराना उपस्थित होते. सुभाष चंद्रा फाउंडेशनच्या वतीने 'सच विजया शिष्यवृत्ती' अंतर्गत पायलट प्रोजेक्ट म्हणून हरियाणातील हिसार नंतर महाराष्ट्रातून नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थिनींची निवड करण्यात आली आहे, हे विशेष. याप्रसंगी महापौर नंदा जिचकार व अन्य मान्यवरांच्या हस्ते मनपाच्या विविध शाळांमधून दहावीमध्ये प्राविण्यप्राप्त विद्यार्थिनींना दोन वर्षासाठी प्रत्येकी २० हजार रूपये शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार आहे. ही शिष्यवृत्ती विद्यार्थिनींच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येणार असून यावेळी सर्व विद्यार्थिनींना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. 'सच विजया शिष्यवृत्ती' अंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थिनींच्या निवडीबद्दल महापौर नंदा जिचकार यांनी सुभाष चंद्रा फाउंडेशनचे अभिनंदन केले.



## गांधीबागमध्ये हायड्रोलिक कचरा टबाचे उद्घाटन

नागपूर : स्वच्छ नागपूरच्या दिशेने नागपूर शहराने वाटचाल केली आहे. रस्त्यावर आता कुठेही कचरा टाकता येणार नाही, यासाठी नागपूर महानगरपालिकेने आधुनिक हायड्रोलिक कचरा टबाची निर्मिती केली आहे. हा कचरा टब गांधीबाग उद्यानाजवळील कचरा घराजवळ सुरू करण्यात आला.हायड्रोलिक कचरा टबाचे उद्घाटन शुक्रवारी (ता.३१) उपमहापौर दीपराज पार्डीकर, आयुक्त अभिजीत बांगर आणि ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वैद्यकीय सेवा व आरोग्य समिती सभापती मनोज चापले, गांधीबाग झोन सभापती वंदना यंगटवार, नगरसेविका विद्या कन्हेरे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, झोन सहायक आयुक्त अशोक पाटील, झोनल अधिकारी सुरेश खरे, उपअभियंता रवींद्र बुंदाडे, सुरेंद्र दुधे प्रामुख्याने उपस्थित होते. शहरात सर्वत्र रस्त्यावर कचरा जमा केला जात आहे. यामुळे त्या भागात अस्वच्छतेचे वातावरण निर्माण होत असते. शहराचे विद्रुपीकरणही होत असते. यामुळे या कचरा टबाची निर्मिती करण्यात आली आहे. ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी यांच्या पुढाकाराने या प्रभागात शहरातील पहिला अत्याधुनिक हायड्रोलिक कचरा टब तयार करण्यात आला आहे. दयाशंकर तिवारी यांनी स्थायी समितीच्या निधीतून या कचरा टबची निर्मिती केली आहे. हा परिसर व्यापारिक असल्यामुळे सफाई कर्मचारी कचरा संकलन करून एका ठिकाणी एकत्र करीत होते. त्या ठिकाणी रस्त्यावर कचरा दिसत होता. आता हायड्रोलिक टबच्या उदघाटन झाल्यामुळे या टबमध्ये जवळपास ५० क्युबिक मीटर कचरा अर्थात् १० गाडी कचरा एका वेळी संकलित करता येईल. म्हणून आता त्या ठिकाणी रस्त्यावर कचरा राहणार नाही. कचरा मोठ्या टबमध्ये हायड्रोलिक लिफ्टच्या साहाय्याने त्या टबमध्ये टाकला जाणार आहे. यावेळी बोलताना आयुक्तांनी या अभिनव संकल्पनेची प्रशंसा केली आहे. याचे देखभाल व दुरूस्ती नियमित करण्यात यावी. दररोज कचरा हा उचलला गेला पाहिजे, अशी सूचनाही झोनल अधिकाऱ्यांना केली. यावेळी अशोक नायक, अविनाश शाहू, राजेश कन्हेरे, बृजभूषण शुक्ला, राजेश गौर, अशोक शुक्ला, कमलेश नायक, मनोज प्रजापती, अमोल कोल्हे, गुड्डू जयस्वाल, सतीश बगले, विनय भाके, जयंत मोटघरे, विशाल गौर, सविता उमाठे, मालती बढिये, विजय सारडा उपस्थित होते.

## स्मार्ट सिटी 'सिटीझन ॲडव्हायजरी फोरम'ची बैठक



नागपूर : स्मार्ट सिटीअंतर्गत देशभरात सुरू असलेल्या प्रकल्पांमध्ये नागपूरचा क्रमांक अव्वल आहे. हे केवळ नागपूरकरांच्या सहभागामुळे शक्य झाले. अशा प्रकल्पांमध्ये लोकसहभाग महत्त्वाचा असतो, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.नागपूर स्मार्ट ण्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या वतीने शुक्रवारी (ता. २५) नागपूर महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज नवीन प्रशासकीय इमारतीतील आयुक्त सभाकक्षात 'सिटीझन डव्हायजरी फोरम'च्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीत अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. बैठकीला एनएसएससीडीसीएलचे सीईओ डॉ. रामनाथ सोनवणे, नगरसेवक राजकुमार साहू, विदर्भ टॅक्सपेअर असोशिएशनचे तेजिंदरसिंह रेणू, स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधी लिना बुधे, अनसुया छाबरानी, पत्रकारांचे प्रतिनिधी रवी गजभिये, राजेश प्रायकर, एनएसएससीडीसीएलचे विजय बनगीरवार उपस्थित होते. महापौर नंदा जिचकार पुढे म्हणाल्या, स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत पारडी, भरतवाडा, पुनापूर परिसरातील सुमारे १७३० एकर क्षेत्रात सुरू असलेला क्षेत्राधिष्ठीत विकास हा आदर्श ठरेल, असेच त्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. या संपूर्ण प्रकल्पात लोकसहभाग लाभत असल्यामुळे होणारा विकास हा वेगाने होत आहे. यामुळेच प्रकल्प राबविण्यात नागपूर क्रमांक एक वर आहे. सिटीझन डव्हायजरी फोरम म्हणजेच नागरिकांचे प्रतिनिधित्व करणारे व्यासपीठ आहे. नागरिकांच्या अडचणी, सूचना या व्यासपीठावर मांडल्या जात असल्याचेही त्यांनी सांगितले. एनएसएससीडीसीएलचे सीईओ डॉ. रामनाथ सोनवणे यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून संपूर्ण देशभरात स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत विविध शहरांमध्ये सुरू असलेल्या विकास कामांची आणि कार्यप्रगतीची माहिती सादरीकरणाच्या माध्यमातून दिली. नागपूर शहरातील प्रकल्पांच्या सद्यस्थितीचे सादरीकरणही त्यांनी यावेळी केले. नागरिकांचे प्रतिनिधी म्हणून बैठकीत सहभागी झालेल्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना सीईओ डॉ. रामनाथ सोनवणे यांनी उत्तरे दिलीत. सिटीझन डव्हायजरी फोरमची बैठक प्रकल्पादरम्यान वेळोवेळी घेण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. बैठकीला स्मार्ट सिटीचे अधिकारी उपस्थित होते.

## इंदिरा गांधी रुग्णालयात अत्याधुनिक उपकरणांसाठी दोन कोटी ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा

### रुग्णालयाच्या नूतनीकरण कामाचे भूमिपूजन

नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या रुग्णालयांनी अनेक पिढ्यांना उपचार देत नवजीवन दिले आहे. एकेकाळी खासगी रुग्णालयांची एवढ्या मोठ्या प्रमाणात उपलब्धता नसताना मनपा रुग्णालयांनीच गरीब, मध्यमवर्गीय नागरिकांना संजीवनी देण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. अनेक आयुष्य वाचविणाऱ्या या रुग्णालयांची अवस्था आता वाईट असून या रुग्णालयांचेच जीवन वाचविण्याची वेळ आली आहे. इंदिरा गांधी रुग्णालयाच्या नूतनीकरणासाठी नागपूर महानगरपालिकेने पुढाकार घेतला असून या रुग्णालयात नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी अत्याधुनिक उपकरणे असणे आवश्यक आहे. या उपकरणासाठी राज्य शासनाकडून दोन कोटी रुपये देण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे ऊर्जा व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.नागपूर महानगरपालिकेच्या वतीने उत्तर अंबाझरी मार्गावरील इंदिरा गांधी रुग्णालयाच्या नूतनीकरण कामाचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महापौर नंदा जिचकार, आमदार डॉ. परिणय फुके, उपमहापौर दीपराज पार्डीकर, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, नगरसेविका डॉ. परिणिता फुके, रुतिका मसराम, नगरसेवक अमर बागडे, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे अध्यक्ष मुन्ना यादव, अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, राम जोशी, अझीझ शेख, आरोग्य उपसंचालक डॉ.के.बी. तुमाने, आरोग्य अधिकारी डॉ. भावना सोनकुसळे, केअरिंग इंडियाचे गुरमीत सिंग विज, डॉ. प्रवीण गंटावार, जयप्रकाश गुप्ता, रमेश गिरडे उपस्थित होते. यावेळी युरीनद्वारे कॅन्सरची तपासणी करणाऱ्या 'कॅन किट'चे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नंदा जिचकार यांच्यासह सर्व मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. या किटद्वारे अवघ्या पाच मिनिटामध्ये कॅन्सरचे निदान होणार आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, प्राथमिक आरोग्य सेवा देण्यामध्ये मनपा रुग्णालयांचे महत्वाचे योगदान आहे. मात्र या रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक सुविधा असणेही आवश्यक आहे. परिसरातील झोपडपट्टी भागातील नागरिकांच्या आरोग्याच्या सुविधेच्या दृष्टीने इंदिरा गांधी रुग्णालय सुरू करण्यात आले होते. या रुग्णालयातून पुढेही उत्तम सुविधा मिळाव्यात यासाठी नागपूर महानगरपालिकेने घेतलेल्या पुढाकाराला सहकार्य करीत शासनाकडून अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासंबंधीची प्रक्रिया लवकरच पूर्ण होईल, असा विश्वासही पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केला. कॅन्सरमुळे दरवर्षी मोठ्या संख्येत नागरिकांचा मृत्यू होतो. यावर आळा घालण्यासाठी केअरिंग इंडियाने पुढाकार घेऊन 'कॅन किट'ची निर्मिती केली. या किटमुळे अनेक लोकांचे जीवन वाचविता येणार आहे. राज्य सरकारच्या आयुष्यमान योजनेतून ५० कोटी नागरिकांचा विमा काढला जात आहे. याद्वारे अनेक मोठ्या आजारावर नि:शुल्क उपचार होणार आहे. या योजनेलाच 'कॅन किट'ला जोडून कॅन्सरमुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याचा संकल्प असल्याचेही पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यावेळी म्हणाले.

## थोडक्यात...

### प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण



नागपूर : आज आपल्या नागपूर शहरामध्ये अनेक विकास कामे सुरू आहेत. शहरात मेट्रोचे काम प्रगतीपथावर आहे. सर्वत्र सिमेंटचे रस्ते तयार होत आहेत. कविवर्य सुरेश भट सभागृहाच्या रूपात देशपातळीवरील सुंदर सभागृह आपल्याकडे आहे. याशिवाय शहरात स्पोर्ट्स थॉरिटी ऑफ इंडियाचे मोठे स्टेडियम, सिम्बॉयसिस सारख्या मोठ्या शिक्षण संस्था येत आहे. आयआयएममुळे शहर शिक्षण आणि आरोग्य हब म्हणून पुढे येत आहे. ई-रिक्षाने अनेकांना आत्मविश्वासाने जगण्याचे बळ दिले. यामध्ये भर घालत सांडपाण्यातून विज निर्मितीचा पथदर्शी प्रयोग आपल्याच नागपुरात सुरू आहे. ही सर्व कामे आज जगामध्ये नागपूरचे नाव उंचावत आहे. एकेकाळी जगात उल्लेखही न होत असलेले नागपूर लवकरच 'ग्लोबल सिटी' म्हणून जागतिक पातळीवर आपला ठसा उमटविणार आहे, असा विश्वास महापौर नंदा जिचकार यांनी व्यक्त केला.भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त शनिवारी (ता.२६) नागपूर महानगरपालिकेच्या सिव्हील लाईन मुख्यालयात आयोजित ध्वजारोहण सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी मंचावर उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती वीरेंद्र कुकरेजा, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, आयुक्त अभिजीत बांगर, अग्निशमन व विद्युत विशेष समितीचे सभापती लहुकुमार बेहते, धरमपेठ झोन सभापती प्रमोद कौरती, नगरसेवक जितेंद्र घोडेस्वार, अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, उपायुक्त राजेश मोहिते, नितीन कापडनीस उपस्थित होते. शहरात विविध ठिकाणी झालेल्या आगीच्या दुर्घटनेतून नागरिकांना सुखरूप बाहेर काढून जीव वाचविणारे सीताबर्डी पोलिस स्टेशनचे हेमंतकुमार खराबे यांच्यासह मनपाचे कर्तव्यदक्ष अग्निशमन अधिकारी व कर्मचा-यांना महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी नरेंद्र नगरचे अग्निशमन केंद्र अधिकारी डी.एन. नाकोड, लकडगंजचे सहायक अग्निशमन अधिकारी राजु सिरकीवार, लकडगंजचे प्रमुख अग्निशमन विमोचक सुरेश आत्राम, यंत्र चालक अशोक घवघवे, अग्शिमन विमोचक मकरंद सातपुते, अग्निशमन विमोचक रवींद्र मरसकोल्हे, अग्निशमन विमोचक शालिक कोठे, ऐवजदार कर्मचारी मनोज गोरे, विभागीय यंत्र चालक कर्मचारी शेख अकलीम यांच्यासह कर्तव्य भावनेतून कार्य करणारे नागरिक अजय टक्कामोरे यांनाही महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

### रामझुला उडाण पुलाच्या दुस-या टप्प्याचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

नागपूर : नागपूर शहर संपूर्ण देशात विकासाचे मॉडेल म्हणून पुढे येत आहे. शहरात सर्वत्र सुरू असलेल्या विकास कामांमुळे देशपातळीवर नागपूर शहराने आपली वेगळी छाप सोडली आहे. नागपूरच्या विकासावाटा दर्शविणा-या रामझुल्याच्या दुस-या टप्प्याचे शुक्रवारी (ता. १८) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थाटात लोकार्पण करण्यात आले. या उडाण पुलामुळे नागपूरकरांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली असून या पुलामुळे रेल्वे स्टेशनलगतच्या जयस्तंभ चौकामधील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. १८ जानेवारीपासून रामझुला वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.लोकार्पण समारंभाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे, महापौर नंदा जिचकार, खासदार डॉ. विकास महात्मे, आमदार सुधाकर कोहळे, डॉ. मिलींद माने, सुधाकर देशमुख, विकास कुंभारे, मनपा सत्तापक्ष नेते संदीप जोशी, विरोधी पक्षनेते तानाजी वनवे, ज्येष्ठ नगरसेवक दयशंकर तिवारी, प्रवीण दटके, ड. संजय बालपांडे, जिल्हाधिकारी अश्विन मुद्गल, मनपा आयुक्त अभिजीत बांगर, मुख्य अभियंता उल्हास देबाडवार, मुख्य अभियंता सुधाकर मुरारे, अधीक्षक अभियंता उज्ज्वल डाबे, मनोज तालेवार आदी उपस्थित होते.

# थोडक्यात...

## पंचशील चौकात केली वीज बचतीसंदर्भात जनजागृती



नागपूर : नागपूर महानगरपालिका आणि ग्रीन व्हिजील फाऊंडेशनच्या वतीने वीज बचतीसंदर्भात जनजागृती करण्यासाठी प्रत्येक पोर्णिमेला 'पोर्णिमा दिवस' उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. सोमवारी (ता. २१) पंचशील चौकात मनपा कर्मचारी आणि ग्रीन व्हिजीलच्या स्वयंसेवकांनी जनजागृती करीत अनावश्यक वीज दिवे एक तास बंद करण्याचे आवाहन करण्यात आले.आमदार प्रा. अनिल सोले यांच्या मार्गदर्शनात नागपूर महानगरपालिकेचे विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंत संजय जैस्वाल, ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे संस्थापक कौस्तभ चॅटर्जी यांच्या नेतृत्वात राबविण्यात आलेल्या उपक्रमात विद्युत विभागाचे सहायक अभियंता ए. एस. मानकर, धरमपेठ झोनचे उपअभियंता एम. एम. बेग, कनिष्ठ अभियंता जी. एम. तारापुरे, सुनील नवघरे उपस्थित होते. यावेळी ग्रीन व्हिजील फाऊंडेशनच्या स्वयंसेवकांनी पंचशील चौकातील प्रत्येक प्रतिष्ठानात जाऊन वीज बचतीबाबत जनजागृती केली. पोर्णिमा दिवस आयोजनाबाबत माहिती दिली. नागपूर शहरात पोर्णिमा दिवस हा उपक्रम मागील काही वर्षांपासून राबविण्यात येत असून या माध्यमातून पोर्णिमेच्या दिवशी रात्री ८ ते ९ या वेळात अनावश्यक वीज दिवे बंद करावे, असे आवाहन मनपा आणि ग्रीन व्हिजीलद्वारे करण्यात येत असल्याचे स्वयंसेवकांनी व्यापाऱ्यांना सांगितले. या माध्यमातून आतापर्यंत १ लाख ३० हजार युनीट वीज बचत झाल्याची माहितीही त्यांनी दिली. स्वयंसेवकांच्या आवाहनाला प्रतिसाद देत पंचशील चौकातील व्यापाऱ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. एक तास वीज बंद ठेवून वीज बचतीच्या चळवळीत योगदान दिले. नागपूर महानगरपालिकेच्या विद्युत विभागाच्या वतीने परिसरातील पथदिवेही बंद करण्यात आले होते. या उपक्रमात महानगरपालिका पदाधिकारी, नगरसेवक, अधिकाऱ्यांचा सहभाग राहात असून त्यांच्या माध्यमातून हा उपक्रम आता चळवळीचे रूप घेत असल्याची माहिती ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे संस्थापक कौस्तभ चॅटर्जी यांनी यावेळी दिली. जनजागृतीच्या या मोहिमेत ग्रीन व्हिजीलचे सुरभी जैस्वाल, मेहुल कोसुरकर, कल्याणी वैद्य, शीतल चौधरी, बिष्णुदेव यादव, दादाराव मोहोड, दिगंबर नागपुरे यांनी सहभाग नोंदविला.

## स्वच्छतेबाबत मनपा आयुक्तांचा आकस्मिक दौरा

नागपूर : स्वच्छ सर्वेक्षण २०१९ संदर्भात शहरात सर्वत्र स्वच्छतेचा प्रचार प्रसार होत आहे. मात्र प्रत्यक्ष शहरातील सफाई कर्मचारी याबाबत किती गांभीर्याने कार्य करीत आहेत, याची पाहणी करण्यासाठी मनपा आयुक्त अभिजीत बांगर दररोज सकाळी शहरातील विविध ठिकाणी आकस्मिक भेट देऊन दौरा करीत आहेत.स्वच्छतेच्या बाबतीत होणाऱ्या कामचुकारपणावर आयुक्तांनी कठोर पवित्रा घेतला असून प्रत्येक झोनमधील स्थिती पाहण्यासाठी आयुक्त अभिजीत बांगर यांनी अधिकाऱ्यांच्या तीन तुकड्या केल्या असून पहिल्या तुकडीत आयुक्त अभिजीत बांगर यांच्यासह अतिरिक्त आयुक्त राम जोशी, दुसऱ्या तुकडीत अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे व अझीझ शेख तर तिसऱ्या तुकडीत उपायुक्त राजेश मोहिते व नितीन कापडनीस यांचा समावेश आहे. तिन्ही तुकड्यांमधील अधिकारी सकाळी ७ ते १० या वेळेत शहरातील विविध भागांमध्ये संबंधित झोनचे सहायक आयुक्त, झोनल अधिकारी, कनकचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत पाहणी करून नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्याबाबत कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देत आहेत. आतापर्यंत आयुक्त अभिजीत बांगर व अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांच्यासह अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, अझीझ शेख, उपायुक्त राजेश मोहिते, नितीन कापडनीस यांनी शहरातील बसस्थानक, शाळा, उद्याने, तलाव, बाजार परिसरात भेट देऊन तेथील पाहणी केली आहे. शहरातील अंबाझरी, फुटाळा, सोनेगाव, सक्करदरा या तलावांनी आयुक्त अभिजीत बांगर यांच्यासह सर्व अधिकाऱ्यांनी भेट देऊन तलावातील गाळ, कचरा काढण्याचे निर्देश दिले. याशिवाय कॉटन मार्केट, कळमना बाजार, धरमपेठ, नेताजी बाजार, सक्करदरा, कमाल टॉकीज, गोकुळपेठ आदी बाजारांना भेट देऊन येथील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देशित केले. शहरातील सार्वजनिक शौचालयांची सुद्धा पाहणी करून येथील स्वच्छतेबाबत निर्देश देण्यात आले. स्वच्छतेच्या कामात बेजाबदारपणा बाळगणारे कर्मचाऱ्यांना शिस्त लावणे तसेच ओला व सुका कचऱ्याचे योग्य संकलन करून त्याची विल्हेवाट लावण्याबाबतची पाहणी करून योग्य कार्यवाही करणे हा या दौऱ्याचा उद्देश आहे. दौऱ्यादरम्यान 'जीपीएस वॉच' न वापरणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. 'जीपीएस वॉच' न वापरणाऱ्या कर्मचाऱ्यांवर पुढेही कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिला.



## दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्यांचे वितरण

नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या समग्र शिक्षा अभियानांच्या समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत नुकतेच दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्यांचे वितरण करण्यात आले. शनिवारी (ता. ५) यशवंत स्टेडीयम येथील क्रीडा प्रबोधिनी हॉलमध्ये १२४ दिव्यांग विद्यार्थ्यांना साहित्य वितरित करण्यात आले. मनपा आयुक्त अभिजीत बांगर व शिक्षण समिती सभापती प्रा. दिलीप दिवे यांच्या मार्गदर्शनात आयोजित कार्यक्रमाला समावेशित शिक्षण नवी दिल्लीचे मुख्य सल्लागार निशीथ वर्मा, शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, समन्वयक अजय काकडे, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे सहायक कार्यक्रम अधिकारी हरीदास डोंगरे, प्राचार्य रवींद्र रमतकर, ड. माधुरी दलाल आदी उपस्थित होते.बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकार अधिनियम २००९ या अन्वये राज्य शासन व स्थानिय स्वराज्य संस्था यांनी प्रत्येक विशेष गरजा असणा-या बालकांना वयाच्या १८ वर्षापर्यंत सुयोग्य व संचारमुक्त वातावरणात शिक्षणाची समान संधी देऊन मुख्य प्रवाहात आणणे व प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने विशेष गरजा असणा-या बालकांची राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियानाअंतर्गत शाळास्तरावर तपासणी आणि तालुकास्तरीय अपंग निदान व उपचार शिबिरात वैद्यकिय तपासणी करण्यात आली. विशेष गरजा असणा-या मतिमंद, बहुविकलांग, सेरेब्रल पाल्सी, अस्थिव्यंग, लॅप्रोसी क्युअर्ड, डारफिजम, मस्क्यूलर डिस्टॉफी, ॲसिड अटॅक विक्टीम, असलेल्या विद्यार्थ्यांना स्नायु व सांध्याअंतर्गत तिव्र दोष असणा-या विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी त्यांना त्यांच्या मापांनुसार साहित्य उपलब्ध करून देण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. त्या अंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांना विविध बॅग, स्पोर्ट्स सिटिंग, वॉकर, कृत्रीम अवयव, क्रचेस, रोलेटर इ. तसेच कर्णबधिर विद्यार्थ्यांना श्रवणयंत्र व अंध विद्यार्थ्यांसाठी ब्रेल किट, ब्लाईंड स्टिक आदी साहीत्य देण्यात आले.

# पंतप्रधान आवास योजनेच्या एक्स्पोला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पाच हजार नागरिकांनी केली नोंदणी : मनपा आणि क्रेडाई, नागपूर मार्फत आयोजित एक्स्पोचा समारोप**



नागपूर : नागपूर महानगरपालिका आणि क्रेडाई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंतप्रधान आवास योजनेच्या एक्स्पोला नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. सुमारे २० हजार नागरिकांनी या एक्स्पोला भेट दिली. त्यातील पाच हजार पेक्षा जास्त नागरिकांनी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकूल योजनेसाठी नोंदणी केली. हा एक्स्पो २५ ते २७ जानेवारी या दरम्यान महापालिका मुख्यालय परिसर, सिव्हील लाईन्स येथे आयोजित करण्यात आला होता. या एक्स्पोचे उद्घाटन शुक्रवारी (ता.२५) ला महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते झाले.या योजनेअंतर्गत ज्या नागरिकांनी अद्यापही प्रधानमंत्री आवास योजनेची नोंदणी केली नव्हती, अशा नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर या एक्स्पोमध्ये नोंदणी केली. नागरिकांना या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत कोणते लाभ मिळू शकतात याचे मार्गदर्शन व माहिती या मेळाव्यातून देण्यात आली. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत ज्यांची स्वःताच्या मालकीची जागा व कच्चे घर आहे, अशा नागरिकांना अडीच लाखाचे अनुदान घर बांधणीसाठी देण्यात येणार आहे. या योजनेच्या घटक क्रमांक ३ अंतर्गत जे नागरिक किरायाने राहतात किंवा त्यांच्याजवळ स्वःताचे घर नाही, त्यांना परवडणाऱ्या किंमतीत घरे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ज्यांना नवीन घरं किंवा सदनिका खरेदी करायचा आहे, त्यांना पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत कर्जामध्ये रूपये २.६७ लक्ष पर्यंत अनुदान मिळणार आहे. या एक्स्पोमध्ये शहरातील नामांकित १९ डेव्हल्पर्स आणि सात बँकानी आपला स्टॉल लावलेला होता. नागरिकांना त्यांच्या बजेटमध्ये कुठे घरे उपलब्ध आहेत याची देखील माहिती या मेळाव्याच्या माध्यमातून देण्यात आली. तसेच त्यांना त्यासाठी लागणाऱ्या कर्जाची माहिती एकाच छताखाली देण्यात आली. अनेक नागरिकांनी विकासकामांचे प्रकल्पांना समक्ष भेटी दिली. मुख्यत्वे या एक्स्पोमध्ये लघु उत्पन्न गट, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांनी भेटी दिल्या. या एक्स्पोच्या यशस्वीतेसाठी महापौर नंदा जिचकार व पदाधिकारी, आयुक्त अभिजीत बांगर, अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले. एक्स्पोमध्ये अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, कार्यकारी अभियंता राजेंद्र रहाटे, कार्यकारी अभियंता गिरिश वासनिक, कनिष्ठ अभियंता मनोज रंगारी, उपअभियंता पंकज पाराशर, क्रेडाईचे अध्यक्ष अनिल नायर, सचिव गौरव अगरवाला यांनी परीश्रम घेतले.



## नागपूरचा प्रणल लांजेवार 'महापौर श्री'चा मानकरी

नागपूर : नागपूर महानगरपालिका व ॲम्यूचर बॉडी बिल्डर्स असोसिएशन नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वर्धमान नगर येथे आयोजित 'महापौर चषक' चवथ्या शरीर सौष्ठव स्पर्धेत नागपूरचा प्रणल लांजेवार 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन' ठरला. त्याला 'महापौर श्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर अमरावतीच्या सर्वेश शाहूला 'बेस्ट पोजर'चा बहुमान मिळाला.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या शरीर सौष्ठव स्पर्धेला आमदार सुधाकर कोहळे, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, गिरीश व्यास, उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती वीरेंद्र कुकरेजा, स्पर्धेचे संयोजक व सत्ता पक्ष उपनेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, भाजयुमोचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके, क्रीडा समिती सभापती नागेश सहारे, नगरसेवक दीपक वाडीभस्मे, संपर्कप्रमुख प्रमोद पेंडके, नगरसेविका वंदना येंगटवार, श्रद्धा पाठक, कांता रारोकर, सरीता कावरे, जयश्री रारोकर, नगरसेवक शेषराव गोतमारे, माजी नगरसेविका रेखा घिगे, क्रीडा अधिकारी नरेश सवाईतुल, क्रीडा निरीक्षक नरेश चौधरी, ॲम्यूचर बॉडी बिल्डर्स असोसिएशनचे अध्यक्ष राजेश तोमर, उपाध्यक्ष राजेश गिरीपुंजे, जनरल सेक्रेटरी चेतन पठारे, सचिव अरूण देशपांडे, , संजय देशमुख, राजेश महाजन, प्रमोद पेंडके आदी प्रामुख्याने उपस्थित होते. सदर स्पर्धा विविध वजन गटात घेण्यात आली. प्रत्येक गटात पाच विजेत्यांना रोख पारितोषिके प्रदान करण्यात आलीत. ६० किलो वजन गटात प्रथम पुरस्कार श्रीकांत बोसरे यांनी पटकाविला. द्वितीय पुरस्कार संदीपसिंग ठाकूर, तृतीय पुरस्कार मनोज महाले, चतुर्थ पुरस्कार धिरज चिताडे तर पाचवा पुरस्कार शेख सिराज शेख मेहबूब यांनी पटकाविला. ६१ ते ६५ किलो वजन गटात विजय ढोके पहिल्या पुरस्काराचे मानकरी ठरले. याच गटात द्वितीय पुरस्कार अभिषेक गायकवाड, तृतीय पुरस्कार योगेश शेंडे, चतुर्थ पुरस्कार मनिष बाथो तर पाचवा पुरस्कार सुयोग तरोडे यांनी पटकाविला. ६६ ते ७० किलो वजन गटात आफाक खान यांनी प्रथम तर आमीर सैफी यांनी द्वितीय पुरस्कार पटकाविला. मयूर नाहाके यांनी तृतीय, रेहान कुरेशी यांनी चतुर्थ आणि शुभम कडू यांनी पाचव्या क्रमांकाचा पुरस्कार पटकाविला. ७१ ते ७५ किलो वजन गटात विजयी होण्याचा मान अकाश पराते यांना मिळाला. सुयश जाडिये हे उपविजेता ठरले. तृतीय स्थानी संदीप धार्मिक, चतुर्थ स्थानी निशांत काहू तर पाचव्या स्थानी सैय्यद रशीद अली यांनी बाजी मारली. ७६ ते ८० किलो वजन गटात प्रणल लांजेवार यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. कमलेश कश्यप यांनी द्वितीय तर भारत बोडाले यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. इशांत पंडित आणि नवीन सिंग यांनी अनुक्रमे चवथा व पाचवा क्रमांक पटकाविला. ८० किलो आणि त्यावरील गटामध्ये सर्वेश शाहू यांनी बाजी मारली. विजय भोयर यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. तृतीय स्थानी किशन तिवारी, चतुर्थ स्थानी संतोष वाघ तर पाचव्या स्थानी वैभव मार्कटेवार यांनी बाजी मारली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्राथमिक फेरीतील विजेत्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन' ठरलेल्या प्रणल लांजेवार यांना ५१ हजार रुपये रोख व चषक, बेस्ट पोजर ठरलेल्या सर्वेश शाहूला ३१ हजार रुपये रोख व शिल्ड तर प्रत्येक गटात विजेत्या ठरलेल्या पहिल्या पाच स्पर्धकांना अनुक्रमे २० हजार, १५ हजार, १० हजार, सात हजार आणि पाच हजार रोख पारितोषिक देण्यात आले.

## रामझुला उडाण पुलाच्या दुस-या टप्प्याचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण



नागपूर : नागपूर शहर संपूर्ण देशात विकासाचे मॉडेल म्हणून पुढे येत आहे. शहरात सर्वत्र सुरु असलेल्या विकास कामांमुळे देशपातळीवर नागपूर शहराने आपली वेगळी छाप सोडली आहे. नागपूरच्या विकासावाटा दर्शविणा-या रामझुल्याच्या दुस-या टप्प्याचे शुक्रवारी (ता. १८) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थाटात लोकार्पण करण्यात आले. या उडाण पुलामुळे नागपूरकरांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली असून या पुलामुळे रेल्वे स्टेशनलगतच्या जयस्तंभ चौकामधील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. १८ जानेवारीपासून रामझुला वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.लोकार्पण समारंभाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे, महापौर नंदा जिचकार, खासदार डॉ. विकास महात्मे, आमदार सुधाकर कोहळे, डॉ. मिलींद माने, सुधाकर देशमुख, विकास कुंभारे, मनपा सत्तापक्ष नेते संदीप जोशी, विरोधी पक्षनेते तानाजी वनवे, ज्येष्ठ नगरसेवक दयशंकर तिवारी, प्रवीण दटके, ड. संजय बालपांडे, जिल्हाधिकारी अश्वीन मुद्गल, मनपा आयुक्त अभिजीत बांगर, मुख्य अभियंता उल्हास देबाडवार, मुख्य अभियंता सुधाकर मुरारे, अधीक्षक अभियंता उज्वल डाबे, मनोज तालेवार आदी उपस्थित होते. राज्यात अशा स्वरूपाचे केबल स्टेड उड्डाण पूल असून वांद्रे वरळी सागरी सेतू आणि संत्रा मार्केट उड्डाण पुलाचा समावेश आहे. दोन्ही पूल रस्ते विकास महामंडळाने बांधले आहेत. या कामाचे कंत्राट मे फकॉन्स इन्फ्रा. लि. मुंबई यांची असून मे. राईटस लि. नागपूर प्रकल्प सल्लागार व्यवस्थापक आहेत. पुलाची एकूण लांबी (पोचमार्गासह) ६०६.७४२ मीटर असून केबल स्टेड पुलाची लांबी २०० मीटर एवढी आहे. या कामाची सुधारित मंजूर किंमत ६९.६२ कोटी एवढी आहे.

# नागपुरात 'इनोव्हेशन'ची चळवळ निर्माण होणार !

नागपूर : संत्रानगरी म्हणून जागतिक स्तरावर आपले नाव लौकीक करणा-या नागपूर शहराची आपल्या नवसंकल्पनांच्या बळावर मान उंचावणा-यांची आपल्या शहरात कमी नाही. त्यांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देउन त्यांच्या नवसंकल्पनांचा उपयोग समाजात परिवर्तन आणण्यासाठी करून देण्याची आज गरज आहे. हाच उद्देश ठेवित यंदा 'महापौर इनोव्हेयशन अवार्ड २०१९' आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमाद्वारे नागपूर शहरामध्ये 'इनोव्हेंशन'ची चळवळ निर्माण होईल, असा विश्वास महापौर नंदा जिचकार यांनी व्यक्त केला.स्मार्ट सिटी अंतर्गत महापौर नंदा जिचकार यांच्या संकल्पनेतून 'महापौर इनोव्हेशन अवार्ड २०१९'चे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत 'मेयर इनोव्हेशन काउंसिल'च्या कार्यालयाचे गुरुवारी (ता. १७) महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी महापौर बोलत होत्या. याप्रसंगी ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, नगरसेविका रूपा रॉय, अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामनाथ सोनवणे, 'मेयर इनोव्हेअशन काउंसिल'चे संयोजक डॉ. प्रशांत कडू, तंत्र शिक्षण संचालनालयाचे सहसंचालक गुलाबराव ठाकरे, निवृत्त प्रादेशिक परिवहन अधिकारी शरद जिचकार, सतीश मेंढे, एम.बी. कुंबथेकर, उच्च शिक्षण संचालनालयाच्या सहसंचालक डॉ. अर्चना नेरकर, यशवंतराव चव्हारण अभियांत्रिकी महाविद्यालयाचे कुलसचिव डॉ. पी.के. डाखोले, तंत्र शिक्षण संचालनालयाचे सहायक संचालक डॉ. एस.आर. कुकाडपवार, इन्स्टिटयूट ऑफ सायन्सच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. संध्या धाबे, सेंटर फॉर क्रिएटीव्हि टी ण्ड इनोव्हेयशनचे हितेंद्र कडू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या बिझनेश मॅनेजमेंट विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. राहुल खराबे, प्रदीप शेंडे, केतन मोहितकर उपस्थित होते. नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत शहराच्या विकास प्रक्रियेमध्ये नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग राहावा. त्यामार्फत शहरातील जनजागृती निर्माण व्हावी हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यासाठी या उपक्रमामध्ये शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग घेण्यात येत आहे. त्यांच्या अनुभव व ज्ञानाचा उपयोग करून विविध क्षेत्रात नागरिकांमध्ये जनजागृती करून त्याचा उपयोग शहराच्या विकास प्रक्रियेमध्ये होणार आहे. यावेळी मान्यवरांनी स्मार्ट सिटी अंतर्गत सिटी ऑपरेशन सेंटरला भेट दिली. शहरातील विविध भागात ठेवण्यात येणारी 'स्मार्ट वॉच' तसेच सुरक्षेच्या दृष्टीने शहरात असलेली अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रणालीची यावेळी मान्यवरांनी पाहणी केली.

# 'ट्रान्सफर स्टेशन'साठी स्मार्ट सिटी देणार ४० कोटी



नागपूर : नागपुरातील घराघरातील कचरा संकलित केल्यानंतर ट्रान्सफर स्टेशनच्या माध्यमातून विलग करण्यासाठी नागपूर महानगरपालिका दहाही झोनमध्ये ट्रान्सफर स्टेशन निर्माण करीत आहे. यापैकी पाच झोनमधील जागा निर्धारीत झाल्या असून या पाच ट्रान्सफर स्टेशनसाठी ४० कोटी रुपये स्मार्ट सिटी प्रकल्प राबविणारी नागपूर स्मार्ट ण्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनी देणार आहे. या प्रस्तावाला शनिवारी (ता. १९) संचालक मंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव प्रवीण परदेसी यांच्या अध्यक्षतेखाली मनपा मुख्यालयातील आयुक्त कक्षात झालेल्या बैठकीला महापौर नंदा जिचकार, आमदार कृष्णा खोपडे, स्थायी समितीचे सभापती वीरेंद्र कुकरेजा, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, मनपा आयुक्त अभिजीत बांगर, नासुप्रच्या सभापती शीतल उगले, एनएसएससीडीसीएलचे संचालक मोहम्मद जमाल, मंगला गेवरे, एनएसएससीडीसीएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामनाथ सोनवणे, पोलिस आयुक्त डॉ. भूषणकुमार उपाध्याय, वाहतूक पोलिस विभागाचे उपायुक्त राजतिलक, एनएसएससीडीसीएलचे तांत्रिक सल्लागार विजय बनगीरवार, उपमहाव्यवस्थापक राजेश दुफारे उपस्थित होते. इंदोरच्या धर्तीवर नागपुरात कचरा ट्रान्सफर स्टेशन साकारले जात आहे. प्रत्येक झोनमध्ये एक असे एकून दहा ट्रान्सफर स्टेशन तयार होणार आहे. यासाठी प्रत्येक झोनमध्ये जागेचा शोध सुरू असून पाच जागा निश्चित झाल्या आहेत. एका ट्रान्सफर स्टेशनला सुमारे आठ कोटींचा खर्च अपेक्षित असून सध्या पाच स्टेशनसाठी ४० कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली. नागपूर महानगरपालिकेतर्फे 'बायो डायव्हर्सिटी'वर कॉफी टेबल बुक काढण्यात येणार असून या खर्चालाही एनएसएससीडीसीएलच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. सदर बैठकीत स्मार्ट सिटी प्रकल्पाशी संबंधित विविध विषय मंजुरीसाठी ठेवण्यात आले होते. प्रत्येक विषयाचा आढावा प्रधान सचिव प्रवीण परदेसी यांनी घेतला. स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत होत असलेल्या क्षेत्राधिष्ठीत विकास प्रकल्पाच्या प्रगतीची माहिती यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामनाथ सोनवणे यांनी दिली. क्षेत्राधिष्ठीत प्रकल्पांतर्गत असलेल्या चार मौजांच्या १७३० एकर परिसरात करावयाच्या विकासाचा आराखडा तयार आहेत. या परिसरात ५२ किलोमीटरचे रस्ते तयार होणार आहेत. प्रकल्पात ज्यांची घरे जातील त्यांच्या पुनर्वसनासाठी सुमारे एक हजार सदनिकांचे बांधकामही कंपनीद्वारे करण्यात येणार आहे. या कामाच्या निविदांच्या आधारे कार्यादेश झाल्यानंतर भूमिपूजन लवकरच होणार असल्याची माहिती यावेळी संचालकांना देण्यात आली.